सायं.दैनिक
# बीड किसान
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक २४९ ▪ शुक्रवार, दि. १६ जानेवारी, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १७ जानेवारी, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-249 ▪ Friday 16 January, 2026 ▪ Postal Date 17 January, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2


## सौ.भाग्यश्री विजयकुमार दायमा यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



गेवराई (किसान न्युज): गेवराईतील ज्येष्ठ व्यापारी दायमा मेडिकलचे सर्वेसर्वा विजयकुमार दायमा यांच्या धर्मपत्नी सौ. भाग्यश्री विजयकुमार दायमा यांना राहत्या घरी हृदयविकाराचा झटका आला. यामध्ये झालेल्या घटनेमुळे महिलेचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार (ता.१६) रोजी राहत्या घरी घडली. या धक्कादायक घटनेने सरस्वती कॉलनीतील पूर्ण परिसर सुन्न झाला असून भाग्यश्री विजयकुमार दायमा यांना हृदयविकाराचा झटका येऊन निधन झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही दुर्घटना शुक्रवारी, १६ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास सिद्धिविनायक कॉलनी येथे घडली. सौ. भाग्यश्री विजयकुमार दायमा (वय ३५) असे मृत महिलेचे नाव आहे. त्यांना अस्वस्थ वाटू लागले. अचानक खाली कोसळताच तातडीने रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला मात्र घरीच त्यांचा आलेल्या हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची बातमी समजताच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. स्थानिक रहिवाशांसह नातेवाईक मित्रपरिवार यांनी घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.चिंतेश्वर स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## माजलगाव निवडणुकीचा प्रवास अर्ज बाद करण्यापासून ते उपनगराध्यक्ष करुन थांबला

# उपनगराध्यक्षपदाला पाठिंबा मिळताच सहालभैय्या चाऊस कोपरापासून ढोपरापर्यंत कराकरा वाकले



## सहालभैय्या आता माखून-माखून खाण्या पेक्षा नगर पालिका चूरुन खावा

बीड । किसान न्युज


माजलगाव नगरपालिका निवडणुकीत आ. प्रकाश सोळंके यांनी ज्यांचा अर्ज बाद करण्यासाठी प्रयत्न केले होते मात्र त्यांनीच पुन्हा उपनगराध्यक्ष होण्यासाठी चाऊस यांना पाठिंबा दिला. यामुळे निवडणुकीत टीका आणि पाठिंबा मिळताच चाऊस हे आ. सोळंके समोर कोपरापासून ढोपरापर्यंत कराकरा वाकल्याचे दिसून आले आहे. सत्ता अशी चादू आहे की, ती फक्त कणखरपणा आणते असे नाही तर वाकायला ही लावते याचा अनुभव काल माजलगावकरांना आला आहे. या घटनेची जिल्ह्यात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

माजलगाव नगरपालिका जिल्ह्यात सर्वाधिक टीका टिप्पणी मुळे गाजली असून येथे दोन राष्ट्रवादी, भाजपा अशी तिरंगी लढत झाली असली तरी आ. प्रकाश सोळंके विरूद्ध सहाल चाऊस अशीच गाजली आहे. या निवडणुकीत सहाल चाऊस यांनी राजकीय कसब वापरुन नगराध्यक्ष म्हणून सुनेला विजय करुन स्वतः ही नगरसेवक म्हणून विजयी झाले. आ. सोळंके यांचा उमेदवार तीन नंबरवर फेकला गेला. निवडणुकीत आ. प्रकाश सोळंके यांनी सहाल चाऊस यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यासाठी प्रयत्न केल्याचा आरोप केला. यानंतर सहाल चाऊस यांनी ही प्रचारा दरम्यान आ. प्रकाश सोळंके यांच्यावर टीकेची तोफ डागली, यामुळे आता हे कधीच एकत्र येणार असे चित्र होते. मात्र निवडणुका संपताच सहाल चाऊस यांना उपनगराध्यक्ष बनण्याची महत्त्वाकांक्षा जागी झाली आणि त्यांनी यासाठी प्रयत्न सुरू केले. जे माजलगावकरांच्या ध्यानीमनी नव्हते ते उपनगराध्यक्षपदाच्या निवडी वेळी घडले असून, ज्यांनी एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडली नाही असे सोळंके आणि चाऊस एकत्र दिसले आणि सहाल चाऊस यांना उपनगराध्यक्ष करण्यासाठी आ. सोळंके यांनी सहाल चाऊस यांना पाठिंबा दिल्याने ते बिनविरोध उपनगराध्यक्ष झाले. यामुळे माजलगावकरांच्या भुवाया उंचावल्या आहेत. मतदारांच्या कौलाचा विचार नकरता स्वतः च्या फायद्यासाठी राजकारणी एकत्र आल्याची चर्चा सुरू झाली आहे. तर या निवडीनंतर नगरपालिका » पान २ वर

### पोटभरेंनी केले मुलाचे लॉन्चिंग



जिल्हापरिषदेत गुलाल लागून सभापती झाल्यानंतर पुन्हा काही सत्तेचा उपभोग घेण्याचा योग आला नाही. अशीच परिस्थिती राहिली तर आपल्या मागे काय? हा विचार करीत बाबूराव पोटभरे यांनी राजकीय डावपेच खेळत आ. सोळंकेंना विरोध करीत ते चाऊस,जगताप यांच्या गोटात सामील झाले. याचा आधार घेत चाऊस उपनगराध्यक्ष तर माझा मुलगा स्वीकृत सदस्य अशी भूमिका घेतली आणि कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडून जगताप यांचा मुलगा आणि बाबूराव पोटभरे यांचा मुलगा स्वीकृत सदस्य म्हणून घेतला आहे. यामुळे बाबूराव पोटभरे यांनी सहाल चाऊस यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपल्या मुलाला स्वीकृत सदस्य करुन राजकारणात लॉन्च केले असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.



### आता ५०० कोटींचा ही भ्रष्टाचार केला तरी बोलायला कोणी नाही!

## आडस परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; आडस येथे ५ दुकाने तर आसरडोह मध्ये २ घरे फोडली

### लाखोंचा ऐवज लंपास तर सीसीटीव्ही डीव्हीआर नेला चोरुन; आडस परिसरात चोरट्यांची दहशत

आडस । किसान न्युज

धारुर पोलीस ठाणे हद्दीतील आडस येथे मुख्य बाजारपेठ असलेली पाच दुकाने तर आसरडोह येथे दोन घरे फोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम सह लाखोंचा ऐवज लंपास केल्याची चर्चा आहे. घटनेची माहिती मिळताच आडस चौकीच्या पोलिसांनी आडस,आसरडोह येथे भेट देऊन पंचनामा केला. तसेच बीड येथून ठसे तज्ञांचे पथक पाचारण करण्यात आले आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात येऊ नये म्हणून एका ठिकणचा डीव्हीआर आणि एका ठिकाणचे कॅमेरे काढून नेले. एकाच रात्री ५ कि.मी.अंतरावरील दुकाने आणि दोन घरे फोडून धुमाकूळ घातल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोऱ्या आणि आडस हे समीकरण बनले असून, नेहमीच चोरीच्या घटना घडत आहेत. पण एकदाही हे चोरटे पोलिसांना सापडले नाहीत. यामुळे पोलिसांपेक्षा चोरटेच हुशार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. तर महिनाभरा पूर्वीच एक कपड्याचे » पान २ वर

### नेहमीच चोऱ्या मात्र तपास एक ही नाही

आडस येथील चोरीच्या गुन्ह्यांचा मागोवा घेतला तर येथे एकप्रकारे चोरीच्या घटनांची मालिकाच दिसून येईल मात्र यातील एकाही चोरीचा अद्याप छडा लावण्यात पोलिसांना यश आलेले नाही. मात्र चोरटे चोऱ्या करण्यात नियमित यशस्वी होत आहेत. पण पोलीस शोध घेत नसल्याने पोलिसांपेक्षा चोरटेच हुशार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.



### ऐन चौकी समोरील दुकान फोडून पोलिसांना आव्हान

आडस पोलीस चौकीच्या समोरील म्हणजे फक्त मध्ये रस्ताच असलेले ओमकार ज्वेलर्स हे दुकान फोडून चोरट्यांनी एक प्रकारे पोलीस प्रशासनाला आव्हान दिले असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. यामुळे पोलीस प्रशासन हे आव्हान स्वीकारुन चोरट्यांना जेरबंद करणार का? याकडे लक्ष लागले आहे.

## जिल्हा रुग्णालयातील सखी केंद्रात महिलेच्या आत्महत्येच्या प्रयत्नामुळे उडाला गोंधळ

बीड । किसान न्यूज

परळी रेल्वे स्थानकातून दोन दिवसांपूर्वी ताब्यात घेण्यात आलेल्या एका महिलेला बीड जिल्हा रुग्णालयातील वार्ड क्रमांक ६ मधील संकट ग्रस्त महिला निवारण सखी केंद्रात ठेवण्यात आले होते. आज शुक्रवारी सकाळी सदर महिलेने सखी केंद्रातील बाथरूममध्ये तोडफोड करत साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. यामुळे जिल्हा रुग्णालयात गोंधळ उडाला होता. हा प्रकार लक्षात येताच घटनास्थळी उपस्थित सखी केंद्रातील कर्मचारी आणि पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून महिलेचा जीव वाचवला. त्यानंतर संबंधित महिलेला बीड शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणाचा तपास डीवायएसपी पूजा पवार या करत असून संबंधित महिलेने आत्महत्येचा प्रयत्न का केला, याबाबत सखोल चौकशी सुरू आहे. चौकशीनंतर या घटनेमागील कारणे स्पष्ट होईल अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली. या घटनेमुळे जिल्हा रुग्णालय परिसरात एकच खळबळ उडाली असून सखी केंद्रातील सुरक्षिततेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.




## मुंबईत ठाकरेंना तर पिंपरी चिंचवडमध्ये पवारांना धक्का

### लातूर मध्ये काँग्रेस, वंचित आघाडी सत्तास्थापन करणार

बीड । किसान न्युज

राज्यातील २९ महानगरपालिकांचे निकाल आज समोर येत असून राज्याचे लक्ष लागलेल्या मुंबई महानगरपालिकेत भाजपा, शिंदे सेनेने आघाडी घेतल्याने ठाकरे बंधूंना हा तर पिंपरी चिंचवड मध्ये भाजपा आघाडीवर असल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धक्का मानला जात आहे. तर भाजपा प्रदेशाध्यक्षांच्या विधानामुळे चर्चेत आलेल्या लातूर महानगरपालिकेत काँग्रेस, वंचित या आचाडीने मुसांडी घेतल्याने येथे काँग्रेस सत्ता स्थापन करणार असे चित्र दिसून येत आहे. मुंबई, ठाण्यासह राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान पार पडलं, त्यानंतर आज दि. १६ निवडणुकीचा निकाल जाहीर होत आहेत. महापालिका निवडणुकीच्या निवडणुकीपैकी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीची राज्यात चर्चा झाली. त्यामुळे मुंबई महापालिका निवडणुकीच्या निकालाकडे राज्याचं लक्ष लागलेलं आहे. मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी निवडणूक पार पडली. दरम्यान मुंबईचा महापौर कोणाच्या पक्षाचा होणार? मुंबईचा महापौर भाजपा-सेना युतीचा होणार की ठाकरे बंधूंच्या युतीचा होणार किंवा आणखी दुसऱ्या पक्षाचा होणार? हे आता थोड्याच वेळात स्पष्ट होणार आहे. तर दुपारी १ वाजेपर्यंत भाजपा-९२, शिवसेना शिंदे-२६, शिवसेना ठाकरे-६०, मनसे - ९, राष्ट्रवादी शरद पवार-०, राष्ट्रवादी अजित पवार-३, काँग्रेस-१२, इतर-८ असे उमेदवार आघाडीवर होते. पिंपरी चिंचवडमध्ये भाजपाने मोठी आघाडी घेतल्याचे चित्र दुपारी होते. यामुळे हा अजित पवार यांना धक्का मानला जातो » पान २ वर

## पोलीस कर्मचाऱ्याचा अपघाती मृत्यू

### बीड पोलीस दलावर शोककळा

बीड । किसान न्युज

ड्युटी करुन घराकडे परत येत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा घराजवळ रात्री दुचाकीचा अपघात होऊन गंभीर जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि.१५) रात्री घडली आहे. या घटनेने बीड पोलीस दलावर शोककळा पसरली आहे. सौदागर माणिकराव सावंत (वय ४७ वर्ष) रा. पंचशील नगर,बीड असे मयत पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते सध्या परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. काल दिवसभर ड्युटी करुन ते रात्री ते बीड येथे घराकडे आले होते. घरापासून काही अंतरावर आले असता त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला. यामध्ये सौदागर सावंत गंभीर जखमी झाले. हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांना जखमी अवस्थेत खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांची प्राणज्योत मालवली आहे. या घटनेने बीड पोलीस दलावर शोककळा पसरली आहे. तर सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



### अपघाताचा सीसीटीव्ही फुटेज व्हायरल

पोलीस कर्मचारी सौदागर सावंत यांच्या अपघाताचा सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाला आहे. ते घराकडे येत असताना ते दुचाकीवरुन जोरात पडल्याचे दिसत असून, रस्ता हा निर्मनुष्य होता. यामुळे त्यांची दुचाकी गतीरोधकावर आदळून हा अपघात घडल्याचे या व्हायरल व्हिडिओ मध्ये दिसत आहे.

## पोलीस पाटील निवडीचा ठरला मुहूर्त

बीड । किसान न्युज

जिल्ह्यातील रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदांसाठी अखेर जिल्हा प्रशासनाने कार्यक्रम जाहीर केला. या पदासाठी लेखी परीक्षा आणि मुलाखती होणार असून २ मार्चला निकाल जाहीर केला जाणार आहे. बीड जिल्ह्यातील पोलीस पाटील भरतीची प्रक्रिया मध्यंतरी एसईबीसी आरक्षणामुळे रखडली होती. त्यानंतर प्रत्येक उपविभागीय अधिकाऱ्यांनी उपविभागाच्या पातळीवर आरक्षण सोडत जाहीर केली होती. तेव्हापासून पोलीस पाटील भरतीचा कार्यक्रम जाहीर होण्याची सर्वांना प्रतीक्षा होती. अखेर आता त्यासाठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. याची १९ जानेवारी रोजी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असून १९ ते ३० जानेवारीपर्यंत अर्ज करता येणार आहेत. ६ फेब्रुवारीपर्यंत प्रवेशपत्र वाटप होणार असून २२ फेब्रुवारी रोजी लेखी परीक्षा तर २४ रोजी लेखी परीक्षेचा निकाल जाहीर होईल, त्यानंतर २५-२६ फेब्रुवरीला मुलाखती होतील. तसेच २ मार्च रोजी अंतिम निकाल जाहीर होणार आहे. यामुळे रगडून पडलेल्या पोलीस पाटील निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
✆ 9850643058
सोने २४ कॅरेट 143,500
२२ कॅरेट 140,000
चांदी प्रतिकिलो 278,000

## आता समाज जागृती, दीनदुबळ्यांच्या न्यायाचा सुरु होणार नवा अध्याय

### मौलाना आझाद सामाजिक फाऊंडेशनच्या स्थापना सोहळ्याला उपस्थित राहावे : अरफात खान

बीड । किसान न्युज

सामाजिक, शैक्षणिक जनजागृती आणि दीनदुबळ्यांच्या आवाज म्हणून मौलाना आझाद सामाजिक फाऊंडेशन स्थापन करण्याता आले. याचा स्थापना सोहळा रविवारी (दि.१८) दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यासाठी बीड शहरासह जिल्ह्यातील सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष अरफात खान यांनी केले आहे. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या, नेहमीच जनसामान्यांच्या मदतीला धावून येणारे अरफात खान आणि त्यांच्या मित्रांनी एकत्र येत मौलाना आझाद सामाजिक फाऊंडेशन स्थापन केले आहे. या फाऊंडेशनच्या माध्यमातून तरुणांना एकत्र करीत देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांच्या विचारांचा आदर्श » पान २ वर



## गुत्तेदारांना फायदा करून देण्यासाठी रस्त्याचे तुकडे - अजय सरवदे

### बीड-पालवण-देवराई रस्ता अर्धवट, नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू



बीड । प्रतिनिधी ।

बीड-पालवन-देवराई-पिंपळवाडी हा सलग व एकसंध रस्ता असताना, सार्वजनिक बांधकाम विभागातील काही अधिकाऱ्यांनी गुत्तेदारांना अनुचित लाभ मिळावा या हेतूने सदर रस्त्याचे काम जाणीवपूर्वक दोन भागांत विभागून दोन वेगवेगळ्या कंत्राटदारांना दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. प्रत्यक्षात एकाच रस्त्याचे दोन तुकडे करून स्वतंत्र कंत्राटे देण्यात आल्याने कामात मोठा विलंब होत असून नागरिकांना त्याची मोठी किंमत मोजावी लागत आहे. देवराई ते पिंपळवाडी या मार्गाचे डांबरीकरण पूर्ण झालेले असताना, देवराई-पालवन-बीड या महत्त्वाच्या टप्प्यावर अद्याप एकही यंत्र सुरू झालेले नाही. या अर्धवट कामामुळे संबंधित मार्गावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून वाहनचालक व पादचाऱ्यांसाठी हा रस्ता अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. अपघातांची शक्यता दिवसेंदिवस वाढत असताना सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या » पान २ वर